नियमीत दिवाणी मुकदमा क्र. ४४६/२०१२
निशाणी क्र. ९४

MHAH230001052014

**सुधीर विश्वनाथ राऊत**
**वि.**
**मालन काशीनाथ राऊत**

## नियमीत दिवाणी मुकदमा क्र. ४४६/२०१२ मधील निशाणी क्र. ९४ खालील आदेश

१. वादी यांनी अर्जाद्वारे प्रतिवादी क्रमांक ७ पार्वती विश्वनाथ राऊत यांचे वारस अभिलेखावर घेण्याबाबत विनंती केली आहे. वादी यांच्या म्हणण्यानुसार दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्रमांक ७ पार्वती विश्वनाथ राऊत यांचे दिनांक १८ ऑगस्ट २०२३ रोजी निधन झाले आहे.

२. वादात पार्वती राऊत यांचे कायदेशीर वारस म्हणून वादी स्वतः, प्रतिवादी क्रमांक ८ संदीप विश्वनाथ राऊत, प्रतिवादी क्रमांक ९ संगीता रामचंद्र माळी आणि प्रतिवादी क्रमांक १० अमिता रमेश मेढे हे आधीपासूनच पक्षकार म्हणून समाविष्ट आहेत. वादीच्या म्हणण्यानुसार याशिवाय पार्वती राऊत यांचे अन्य कोणतेही वारस नाहीत.

३. वादातील अभिलेखावरून हे स्पष्ट होते की, वरील नमूद व्यक्तीच पार्वती राऊत यांचे कायदेशीर वारस आहेत आणि ते वादात सुरुवातीपासूनच पक्षकार म्हणून समाविष्ट आहेत. म्हणुन न्यायालय आदेश देते की,

## आदेश

१. वादीचा अर्ज ग्राह्य धरून, प्रतिवादी क्रमांक ७ पार्वती विश्वनाथ राऊत यांचे वारस म्हणून वादी, प्रतिवादी क्रमांक ८, ९ व १० हेच कायदेशीर वारस असल्याचे अभिलेखावर घेतले जाते. यापुढे वादात त्यांच्याच वतीने कार्यवाही चालविण्यात येईल.

नियमीत दिवाणी मुकदमा क्र. ४४६/२०१२
निशाणी क्र. ९४

२. वादी यानी प्रतिवादी क्र. ७ यांच्या नावासमोर मयत म्हणुन दावा दुरुस्त प्रत दाखल करावी.

RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Digitally signed by RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Date: 2025.11.12 11:15:58 +0500

**दिनांक** – ०७.११.२०२५ रविंद्र भ. खवले,

**ठिकाण** – श्रीगोंदा **२ रे, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, श्रीगोंदा**